MHAH210011682022

## **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३२५/२०२२**
## **मधील नि.क्र.१ खालील आदेश**

**(जुलफुकारअलीखान पठाण वि. नगरपरिषद कार्यालय जामखेड )**

अर्जदाराने प्रस्तूतचा अर्ज, जन्म, मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत त्याचे आजोबा नामे इम्तियाजखान रहिमखान पठाण यांच्या मृत्यूची नोंद सामनेवाला–नगरपरिषद कार्यालय जामखेड ता. जामखेड जि. अ.नगर यांच्या कार्यालयातील मृत्यू नोंदवहीला घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** अर्ज व त्यावर सामनेवाला यांनी **निशाणी क्र. ०८** प्रमाणे दाखल केलेले म्हणणे वाचले.

**०३.** अर्जदाराच्या अर्जातील थोडक्यात कथन असे की, अर्जदाराचे आजोबा नामे इम्तियाजखान रहिमखान पठाण यांचा मृत्यू दिनांक २०/०९/१९९३ रोजी मौजे जामखेड येथे झालेला आहे. तसेच, अर्जदार यांच्याकडून मयताची सामनेवाला यांच्या कार्यालयात सदर मृत्यूची नोंद विहीत मुदतीमध्ये करण्यात आलेली नाही. तसा दाखला नगरपरिषद कार्यालय जामखेड, यांनी अर्जदारास दिलेला आहे. अर्जदार यास शासकीय कागदोपत्री नोंद व वारसाची नोंद करणेसाठी मृत्यू प्रमाणपत्राची अंत्यत आवश्यकता आहे. म्हणून अर्जदाराने प्रस्तूत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** मी अर्जदाराच्यावतीने श्री. ए. ए. पठाण, वकील यांचा युक्तीवाद श्रवण केला व अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे सूक्ष्मपणे अवलोकन केले.

**०५.** अर्जदाराने **निशाणी क्र. १२** आधारे दाखल केलेल्या पुराव्याचे शपथपत्राचे अवलोकन करता त्याने त्याच्या अर्जातील कथनांचा पुनरउच्चार केला असल्याचे दिसून येते. तसेच अर्जदाराला **निशाणी क्र. १३** प्रमाणे नगरपरिषद कार्यालय जामखेड यांनी दिलेले मयताचे मृत्यू अनुपलब्ध प्रमाणपत्र तसेच, **निशाणी क्र. १४** प्रमाणे अर्जदाराचे पडताळणी केलेले आधार कार्ड अभिलेखावर दाखल केलेले आहे. **शेवटी,** अर्जदाराने **निशाणी क्र. १५** प्रमाणे त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

**०६.** अर्जदाराने शपथपत्राधारे दाखल केलेला मौखिक पुरावा व अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदोपत्री साक्षीपुराव्याचा सारासार विचार करता, अर्जदाराचे आजोबा नामे इम्तियाजखान रहिमखान पठाण यांचा मृत्यू दिनांक २०/०९/१९९३ रोजी मौजे जामखेड ता.

जामखेड जि. अ.नगर येथे झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०५/११/२०२२ च्या दैनिक लोकमंथन (निशाणी क्र. ११) या वृत्तपत्रामध्ये अर्जदाराच्या मागणीविषयी जाहीर प्रगटन प्रसिध्द करुन देखील विहीत कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच, सामनेवाला यांनी निशाणी क्र. ०८ प्रमाणे दाखल केलेल्या म्हणण्यानुसार, नमूद मयताच्या मृत्यूची नोंद त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखामध्ये नसून योग्य तो आदेश होणेबाबत सामनेवाला यांनी कळविले आहे. त्यामुळे सामनेवाला यांची नमूद मयताच्या मृत्यूची नोंद घेणेबाबत कांही एक हरकत अथवा आक्षेप असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे, अर्जदाराच्यावतीने दाखल करण्यात आलेला साक्षीपुरावा अप्रतिवादित/ अबाधित राहिलेला आहे.

**०७.** वरील नमूद मयताच्या मृत्यूची नोंद त्याचा मृत्यू झाल्यापासून एक वर्षाच्या आत सामनेवाला यांच्या कार्यालयात घेण्यात आलेली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे, सदर मयताच्या मृत्यूची नोंद, सामनेवाला यांच्या कार्यालयात करणे न्याय्य व योग्य होईल. तसेच, अर्जदार संबंधीत कार्यालयाकडून नमूद मयताचे मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे असे प्रथमदर्शनी सिध्द होते. करिता, न्यायाच्या दृष्टीकोनातून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला – नगरपरिषद कार्यालय जामखेड, ता. जामखेड जि. अ.नगर यांना आदेशीत करण्यात येते की, अर्जदाराकडून नियमाप्रमाणे आवश्यक ते शुल्क स्विकारून, अर्जदाराचे आजोबा नामे इम्तियाजखान रहिमखान पठाण यांचा मृत्यू दिनांक २०/०९/१९९३ रोजी मौजे जामखेड, ता. जामखेड जि. अ.नगर येथे वृध्दपकाळाने झाल्याची नोंद, त्यांच्या कार्यालयातील संबंधीत मृत्यू नोंदवहीमध्ये घेण्यात यावी व त्याप्रमाणे मृत्यू प्रमाणपत्र अर्जदाराला देण्यात यावे.

३. येणे प्रमाणे संबंधीतांना कळविण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2023.05.13 17:12:33 +0630

दिनांकः १३/०५/२०२३

( व्ही. व्ही. जोशी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
जामखेड

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of the this PDF file order are same word to word, as per the original Order.

Typed by :- एस. एम. मुंडे (लघुलेखक)

## ENDORSEMENT

| | | |
|---|---|---|
| Order dictated on | : | 13.05.2023 |
| Transcription Ready on | : | 13.05.2023 |
| Order checked and signed off | : | 13.05.2023 |